# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ३४१७ /२०२३**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. तिमा फागोजी मेंघरे, रा. भोजापूर, पो. ता. रामटेक जि. नागपूर - ४४११०६ | ग्रामपंचायत अधिकारी, गट ग्रामपंचायत, मानापूर, ता. रामटेक जि. नागपूर | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर |

**सुनावणी दिनांक :- ११.०३.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २१.१२.२०२३

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २२.१२.२०२३

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती देण्यास नकार.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०.०७.२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१.०७.२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि. ०१.०३.२०२१ ते दि. १८.०७.२०२३

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : ग्रामपंचायत मानापूर येथील संपूर्ण कॅश बुकच्या सत्यप्रतीलीपी मिळण्याबाबत.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ ची माहिती ही ग्रामपंचायत कार्यालयाकडे असून संपूर्ण कॅश बुक च्या सत्यप्रती ४१५ आहेत जर आपणास सदर माहिती हवी असल्यास ४ रु. प्रति प्रमाणे १६६०/- रुपये DD स्वरुपात

सामान्यफंड या नावाने तयार करुन ग्रा. पं. ला सादर करावा त्यानंतर आपणास माहिती पुरविण्यात येईल, असे अपीलार्थीस कळविले.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०९.०८.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १०.०८.२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती न मिळाल्यामुळे

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती रामटेक यांनी दिनांक १३.०९.२०२३ रोजी सुनावणी घेवून दिनांक १३.०९.२०२३ रोजी आदेश पारीत केले आहे. आदेशात अपीलार्थी यांचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. त्यांनी शुल्क भरूण माहिती अधिकारी यांचेकडून माहिती घ्यावी, असे आदेश पारीत केले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा सचिव, यांनी दिनांक ३१.०७.२०२३ ला मोघम स्वरुपाचे पत्र दिले. त्यात माहितीचे वर्णन नव्हते व मला अनावश्यक पैशाची मागणी करण्यात आली. त्यामुळे प्रथम अपील अर्ज दिनांक ०९.०८.२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दाखल केला. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशात माहितीच्या अधिकारातील नियमांचा भंग केला आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर मला मानसिक त्रास दिल्यामुळे यांच्याकडून रु. १.०० लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकाऱ्याच्या नियमानुसार कलम २०(१), २०(२) नुसार कार्यवाही करुन कलम ७ नुसार मला नि:शुल्क माहिती देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

२. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत मानापूर, श्री. निवृत्ती वि. नेवारे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पं.स. रामटेक, श्री. एस.एफ. सानप उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, एकूण ४१५ कॅशबुकच्या प्रतीसाठी प्रती पेज ४/- रुपये प्रमाणे एकूण १६६०/- रुपये DD स्वरुपात सामान्यफंड या नावाने तयार करुन ग्रा. पं. ला सादर करावा त्यानंतर माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले होते. परंतु अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा न करता प्रथम अपील दाखल केले होते. त्यानुसारही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३.०९.२०२३ रोजी सुनावणी घेवून अपिलार्थी यांनी शुल्क भरूण माहिती अधिकारी यांचेकडून माहिती घ्यावी, असे आदेश पारीत केले आहे. तसेच सदर कॅशबुकच्या प्रती हया मोठया पेजमध्ये असल्यामुळे त्यासाठी प्रती पेज ४/- रुपये आकारण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

६. निष्कर्ष –

सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. मेंघरे यांनी केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली प्रक्रिया आणि प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याबाबत आयोगाची खात्री पटली आहे.

अपिलार्थी यांना आजही माहिती हवी असेल तर जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे आवश्यक शुल्क भरावे आणि माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी शुल्क प्राप्त होताच अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी, या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त निर्देशानुसार प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर*

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.०३.२०२६**

जावक क्रमांक 2364 दिनांक 23 MAR 2026